
प्रोग्रॅम डेव्हलपर




# अमृतवेल बिझनेस

July 2016 / ₹ : 100/-

www.amrutwelmedia.com



▲ अशोक जैन,
चेअरमन, जैन उद्योग समूह

JAIN
Jain Irrigation Systems Ltd.

## वारसा कार्यसंस्कृतीचा




## जैन ठिबक केवळ पाण्याची बचत करते एवढंच नव्हे तर उत्पादनही वाढवते... आणि त्यातील साखरेचा उताराही!!

पाण्याची अचूक मात्रा - हवी तेव्हां, हवी तितकीच ऊसाच्या थेट मुळाशीचं देऊन सतत वाफसा स्थिती राखणारी केवळ हीच एकमेव पद्धत आहे.

### उसासाठी जैन ठिबक वापरण्याचे फायदे !

- आपल्या जमिनीमधील ओलाव्याचे (वाफसाचे) प्रमाण अगदी सुयोग्य राखते.
- पारंपरिक सिंचनाच्या तुलनेत पीक लवकर हाती येते.
- मजुरीच्या खर्चातही बचत.
- लोडशेडींगमध्ये सुद्धा उसाला पाणी देणे सोयीचे.
- ऊसासाठी सरफेस व सबसरफेस सिंचन प्रणाली उपलब्ध.
- शेतक-यांच्या व पिकांच्या गरजेप्रमाणे सिंचन प्रणाली देणारी भारतातील एकमेव कंपनी.




* नियम व अटी लागू

जैन ठिबक
पाणी थेंबानं. पीक जोमानं!®

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापारी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

फोन : ०२५७ - २२५८०११; फॅक्सः ०२५७- २२५८१११; ई-मेलः jisl@jains.com वेबसाईटः www.jains.com

कार्यालये : अहमदनगर : ९४२२७७२२४८, अकोलाः ९४०३०८०१३२, ९४०३६९५८३७, अमरावती : ९४०३६९५८५६, ९४२२७७६८०५, औरंगाबाद : ९४२२७७४९१२, बीड : ९४२२७७६८२७, बुलढाणा : ९४२२२८३४२४, जळगाव : ९४२२७७४९१८, ९४२२७७४९८१, ९४२२७७४९८६, जालनाः ९४२२७७५९१२, कोल्हापूर : ९४२२७७२२५२, लातूर : ९४२२७७३३८९, नागपूर : ९४२२२८३४०८, ९४०३०८०१७१,९४२२७७६८३३, नांदेड : ९४०३०८०१०९, , नंदुरबार :९४०३७७०६२१, नाशिक : ९४२२७७४९१६, ९४०३७७०६२५, पंढरपूर : ९४२२७७३३९०, पुणे : ९४२२२८३४२९, यवतमाळः ९४२२७७५९०९, रत्नागिरी : ९४२२२९२१०८, वर्धाः ९४२२७७४९२७,९४०३६९५८९०, सांगली : ९४०३७७०६००, ९४२२७७४९७६, सातारा : ९४२२७७४१८६, सोलापूर : ९४०३६९५८८६, ९४२२७७६८२६. ठाणेः ९८७०९९०७५४.

**सिंचनाची सर्व साधने एकाच छताखाली बनवणारी जगातील एकमेव अग्रगणी कंपनी !**



▲ अशोक जैन,
चेअरमन, जैन उद्योग समूह

Jain Irrigation Systems Ltd.

जोखीम, सचोटी, व्हिजन या तत्त्वांचा अंगीकार करत पद्मश्री भंवरलाल जैन यांनी जैन इरिगेशनची उभारणी केली आणि सिंचन, पाईप, टिश्यूकल्चर व फळ प्रक्रियेच्या माध्यमातून जळगावमधला उद्योग जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवला. त्यामागे शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्याचं स्वप्न होतं. त्यासाठी आवश्यक असणारी नवी कार्यसंस्कृती त्यांनी निर्माण केली. त्याच कार्यसंस्कृतीचा वारसा जपत आणि तेच स्वप्न पूर्णत्वाला नेण्याचं ध्येय बाळगत मोठ्या भाऊंनी आखून दिलेल्या मार्गावरून निष्ठेनं वाटचाल करण्याचं धोरण मुलांनी स्वीकारलेलं आहे. याच भूमिकेतून भंवरलाल जैन यांच्या मागे **अशोक जैन** यांनी या उद्योगाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली आहे. जैन उद्योग समूहाचे नवे चेअरमन म्हणून त्यांच्याशी साधलेला हा संवाद...

**धर्मेंद्र पवार**
amrutwelmedia@gmail.com

# वारसा कार्यसंस्कृतीचा

**मोठ्या भाऊंच्या मागे उद्योगाची धुरा आपल्या खांद्यावर घेताना कोणत्या भावना मनात होत्या?**

मुळात भाऊ नाहीत, असं जाणवतच नाही. ते आजही आमच्यात आहेत. त्यांचं अस्तित्व सर्वत्र आहे, असंच आम्हाला वाटतं आणि आम्ही तसंच मानतो आहोत. त्यामुळे त्यांचं बोट धरूनच आपल्याला पुढे जायचं आहे हीच भावना त्यावेळी मनात होती आणि यापुढेही ती कायम असेल. कंपनी चालवताना नफा मिळवणं हे आमचं कधीच ध्येय नव्हतं. ज्यामध्ये आपल्या गरजा भागतात तेवढंच आपलं, बाकी उरलेलं सारं समाजाचं, ही मोठ्या भाऊंची भावना होती. तीच आमची होती आणि आजही आहे. त्यामुळे त्यांचं बोट धरून चालायचंय हाच भाव आम्हा चौघाही भावांमध्ये आहे. म्हणूनच शेतकरी हसला तर बरं वाटतं, हा विचार आजही मनात कायम ठेवून समाज व शेतकऱ्यांच हित हेच कंपनीचं व्हिजन होतं आणि यापुढेही ते राहील. त्यानुसारच आम्ही भाऊंच्या मागे नव्यानं वाटचाल सुरू केली आहे. भाऊंचे संस्कार आणि त्यांनी करून ठेवलेली कामांची आखणी त्याच दिशेने घेऊन जाणारी आहे.




**जैन इरिगेशन उद्योग समूहाने आजवर समाज व शेतकऱ्यांच्या हितासाठीचं काम केलं आहे. हे व्हिजन या पुढच्या काळात कसं साध्य केलं जाणार आहे?**

जैन उद्योग समूहाची आजवरची वाटचाल अर्ध्या शतकाची आहे. १९६३ साली 'जैन ब्रदर्स' नावाची कंपनी वडील भंवरलाल जैन यांनी स्थापन केली होती. तेव्हापासून त्यांनी दूरदृष्टी ठेवत प्रतिकूल परिस्थितीवर मात केली. जोखीम, परिश्रम, सचोटी या बळावर त्यांनी उद्योगाचा पाया भक्कम केला. आपण समाजाकडून दररोज काही घेत असतो, त्यामुळे आपण समाजाचं मोठं देणं लागतो, या भावनेनं त्यांनी व्यवसायात काही तत्त्व आणि नियम अंगीकारले. त्याचे शेवटपर्यंत पालनही केले. कधी कोणाचीही नक्कल न करता सतत नावीन्याचा शोध घेतला. त्यातूनच जळगावचा हा उद्योग जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला. आम्ही तोच वारसा जपण्याचा प्रयत्न करत आहोत.

**शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने पाईप, ठिबक सिंचन, टिश्यूकल्चर आणि फळ प्रक्रियेच्या माध्यमातून जैन उद्योग समूहाने क्रांती घडवून आणली आहे. या पुढच्या काळात अशा कोणत्या बाबींवर काम केलं जाणार आहे?**

आम्ही सातत्याने शेतकरी आणि ग्रामीण भागाच्या विकासावर भर दिला आहे. आम्हाला मिळणाऱ्या पुरस्कारांपेक्षाही शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचा समाधानाचा भाव अधिक महत्त्वाचा वाटतो. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना समाधान कसं मिळेल यावरच आमचं लक्ष राहणार आहे. त्यादृष्टीने या पुढच्या काळात कांदा, केळी, ऊस, डाळिंब प्रक्रियेला चालना देण्याबरोबरच जिरायती शेतकऱ्यांसाठी काहीतरी करण्याचा ध्यास जैन इरिगेशनने घेतला आहे. केळीच्या बाबतीत आम्ही केलेल्या संशोधनामुळे केळी पिकाचा कालावधी २२ वरून अवघ्या ११ महिन्यांवर आला आहे. आता तो नऊ महिन्यांवर आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्याचबरोबरीने केळी लागवड आणि उत्पादन वाढीसाठी विशेष भर दिला जाणार आहे. याशिवाय कांद्याच्या अधिक उत्पादनासाठी सुधारित तंत्राचा प्रसार करून शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिलं जाणार आहे. जैन इरिगेशनच्या निर्जलीकरण प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर कांद्याची गरज भासते; परंतु स्थानिक पातळीवर अपेक्षेनुसार उत्पादन होत नाही. त्यामुळे बाहेरच्या राज्यातून कांदा आयात करावा लागतो. अमेरिकेतही असाच एक प्रकल्प आपण उभारला आहे; पण तिथे केवळ दोनच शेतकरी या प्रकल्पाला लागणाऱ्या कांद्याचा पुरवठा करतात. आपल्याकडे अद्याप हे घडू शकलेलं नाही. त्या दृष्टीने सुधारित तंत्राचा वापर करून कांद्याचं उत्पादन वाढविण्यावर भर देणार आहोत.



**अशोक जैन,**
चेअरमन, जैन उद्योग समूह

**भाऊ आता शरीररुपाने आपल्यामध्ये नाहीत, पण ते काय सोडून गेले आमच्यासाठी, हे भाऊंच्याच शब्दात सांगतो, 'पैशाच्या ठिकाणी कामाचा, संपत्तीच्या ठिकाणी परिश्रमाचा आणि वैभवाच्या ठिकाणी जबाबदारीचा वारसा सोडतो आहे. भाऊ सांगतेच्या प्रवासाबाबत म्हणाले होते, अशोक, मी गेल्यानंतर तू जी स्मरणशिळा बनवशील त्यावर लिही, येथे अशी व्यक्ती विश्रांती घेत आहे, ज्या व्यक्तीने सतत काम करीत राहण्याचाच ध्यास धरला होता.'**



**टिश्यूकल्चर तंत्रज्ञानामुळे केळीच्या उत्पादनात भरघोस वाढ झालेली दिसते. त्याच धर्तीवर कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्याच्या दृष्टीने काय करता येईल? आपण त्यादृष्टीने काही विचार करत आहात काय?**


हे खरंच आहे की, टिश्यूकल्चरमुळे केळीच्या उत्पादनात वाढ झाली आहे; पण त्याचा उलटा परिणाम असा झाला आहे की, उत्पादनवाढीमुळे मागणीपेक्षा जास्त पुरवठा होत असल्याने केळीच्या दरात घट होऊ लागली आहे. यावर निर्यात हा उपाय आहे. त्यासाठी शासनाच्या पातळीवर केळी निर्यातीला चालना मिळण्याची गरज आहे. निर्यातक्षम दर्जेदार केळीला जगभरात मागणी आहे. आपण तसं उत्पादन घेऊ शकतो. विशेष म्हणजे, फिलिपीन्सपेक्षा भारतातील केळीची गुणवत्ता व टिकाऊपणा अधिक चांगला आहे. आजचं एकूण चित्र पाहता रोज २० ते २५ कंटेनर केळी निर्यात केली जाऊ शकते. त्यासाठी शेतकऱ्यांनाही गुणवत्तापूर्ण केळी उत्पादनावर भर द्यावा लागेल. या पार्श्वभूमीवर कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्याच्या दृष्टीने सूक्ष्म सिंचनावर अधिक लक्ष देण्याची गरज आहे. ओलिताखालील शेतीचे मर्यादित क्षेत्र लक्षात घेत ठिबक सिंचनाला चांगले भवितव्य आहे आणि वावही आहे. अनेकांनी ठिबकचा वापर करून पाण्याच्या कमतरतेवर तर मात केली आहेच; पण त्याचबरोबर उत्पादनातही वाढ करून दाखविली आहे. उसासारखं जास्त पाणी पिणारं पीक ठिबकखाली घेतलं, तरच पाण्यात मोठी बचत होतेच शिवाय एकरी उत्पादनही शंभर टनापर्यंत नेता येतं. तसं अनेकांनी सिद्ध केलं आहे. त्यामुळे ठिबक तंत्राचा प्रसार, प्रचार होणं गरजेचं आहे. त्यासाठी शासनाकडून योग्य नियोजनाची आणि समान धोरणाची अपेक्षा आहे. आज केंद्र आणि राज्यांमध्ये याबाबतीत समन्वय नसल्याने कुठे शंभर टक्के, तर कुठे ८०, ५० टक्के अनुदान शेतकऱ्यांना यासाठी दिलं जातं. अनुदानाची रक्कमही वेळेवर मिळत नाही. त्यामुळे सहज उपलब्ध असणारं ठिबक तंत्रज्ञान वापरात शेतकऱ्यांना अडथळे येत आहेत. त्यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीने आम्ही सरकारशी चर्चा करत आहोत. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळण्याची आशा आहे.

## भाऊंची उणीव भासणार नाही

*भंवरलाल जैन यांच्या निधनाने एकूणच भारतीय उद्योगविश्वात एक पोकळी निर्माण झाली आहे. तशीच ती जैन इरिगेशनमध्येही निर्माण झाली आहे. अर्थात भाऊ आपल्या सोबतच आहेत हा भाव जैन उद्योग समूहातील सर्वांच्याच मनात आहे. असं असलं तरी आजवर कोणताही निर्णय घेताना समूहाच्या संचालकांना भाऊंचं कवच होतं. ते आज उरलं नसल्यानं काहीशी कसरत करावी लागते, असं सांगत अशोक जैन म्हणतात, भाऊंच्या मागे आज माझ्याकडे कंपनीचं प्रमुखपद आलेलं असलं तरी पूर्वीप्रमाणेच आजही माझं कामकाज चालू आहे. अनेक लोक, सहकारी पूर्वीच्याच भावनेतून मला भेटायला येतात. मीही मनमोकळेपणाने त्यांच्याशी संवाद साधतो. यात प्रोटोकॉलचा अडथळा येतो. तो दूर व्हावा म्हणून मी खुर्चीपेक्षा कामाला अधिक महत्त्व देतो. त्याद्वारे भाऊंची उणीव भेटायला येणाऱ्या कोणालाच भासणार नाही याचीही दक्षता घेतो.*

**केंद्र आणि राज्यातल्या सत्ताबदलाचा एकूण शेती क्षेत्रावर काय परिणाम झाला आहे? तुम्ही याकडे कसं बघता?**

माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या कार्यकालात शेती क्षेत्रात झालेले बदल चिरकाल टिकणारे होते. त्यांच्यासारखे काम आज होणं अपेक्षित आहे, तरच शेतीचा सर्वांगीण विकास होऊ



शकेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, नितीन गडकरी हे जाणकार नेते केंद्रात आहेत. मोदी यांनी पाणी व्यवस्थापनावर काम सुरू केलं आहे. त्यामुळे याबाबतीत मोठे बदल होण्याची आशा निर्माण झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही शेतीच्या शाश्वत विकासासाठी आग्रही आहेत, असं दिसतंय. त्यामुळे योग्य नियोजन आणि ठोस धोरणांची अपेक्षा आहे.

**ग्रामीण विकासाचं स्वप्न साकारण्यासाठी मोठ्या भाऊंनी महात्मा गांधींचा मार्ग निवडला. त्यातूनच जैन हिल्सवर गांधीजींचं भव्य स्मारक त्यांनी साकारलं. त्याला गांधी रिसर्च फाउंडेशनची जोड दिली. त्याचा यापुढच्या काळात कसा उपयोग केला जाईल?**

गांधी रिसर्च फाउंडेशन हे केवळ वस्तूसंग्रहालय नाही. त्यामागची संकल्पना खूप व्यापक आहे. त्यासंदर्भात भाऊंनी पुढचा सगळा मार्ग आखून ठेवला आहे. त्यामुळे त्यावरून केवळ वाटचाल आम्हाला करायची आहे. त्यानुसार फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामविकासासह जलसंधारणाची कामं हाती घेतली जाणार आहेत. शेती आणि पाणी या विषयांवरची एक संशोधन संस्था अथवा विद्यापीठ जळगावमध्ये स्थापन करण्याचा विचार आहे. कमी उत्पन्न गटातील रुग्णांवर मोफत उपचार करता यावेत यादृष्टीने भंवरलाल जैन यांच्या नावानं एक सुसज्ज रुग्णालय उभारण्याचाही मानस आहे. त्याचबरोबर कृषी क्षेत्रात चांगलं काम करणाऱ्यांना राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचाही प्रस्ताव आहे.

**सामाजिक उत्तरदायित्त्व हे जैन उद्योग समूहाचं वैशिष्ट्य आहे. जे काही करायचं ते समाजासाठी, समाजातल्या सर्वांत खालच्या घटकांसाठी, ही दिशा सुरुवातीपासून आजपर्यंत कायम आहे. यात ज्यांच्यामुळे हा उद्योगसमूह उभा राहिला, वाढला, विस्तारला त्या सहकाऱ्यांसाठी काही आहे का?**

मोठ्या भाऊंच्या मागे मी चेअरमनपद स्वीकारल्यानंतरही समूहातल्या सर्वच सहकाऱ्यांना ही कंपनी आपली आहे असं वाटतं. त्याच भावनेतून आजही प्रत्येकजण काम करतो. याचं कारण, ही कंपनी आपल्या सर्वांची आहे असं गृहीत धरूनच अधिकारी,

## जगाने जळगावात यावं

*कोणतंही काम असं करा की, तुम्हाला जगात इतरत्र जाण्याची गरज भासणार नाही. किंबहुना जगाने तुमच्याकडे आलं पाहिजे, ही मोठ्या भाऊंची शिकवण होती. त्यातून त्यांनी एक कार्यसंस्कृती निर्माण केली. त्याच जोरावर जगभर पसरलेल्या जैन उद्योग समूहाचं मुख्यालय न्यूयॉर्कमध्ये न करता त्यांनी ते जळगावात उभारलं. त्यामुळेच जळगाव मुख्यालय असलेल्या आमच्या उद्योगाची एक शाखा अमेरिकेत, न्यूयॉर्कला आहे, असं आम्ही अभिमानाने सांगू शकतो. म्हणूनच आम्ही कुठे परदेशात जाण्यापेक्षा जगाने जळगावात यावं यासाठी भाऊंची शिकवण, त्यांची तत्त्वे अंगीकारत हा उद्योगसमूह त्यांच्या मागेही त्यांनी निर्माण केलेल्या मार्गानेच पुढे जाईल, असं अशोकभाऊ आवर्जून सांगतात...*







सहकाऱ्यांवर विश्वास टाकला जातो. तेही त्याच विश्वासाने मनापासून काम करतात. तुम्ही तुमच्या कामाचे मालक आहात, मालकासारखे वागा ही भावना भाऊंनी रुजविली. म्हणूनच कंपनी प्रगतीचे नवनवे टप्पे गाठत आहे. याचं भान भाऊंनी शेवटपर्यंत बाळगलं. त्यातूनच सहकाऱ्यांसाठी हेल्मेट सक्ती, व्यसनमुक्ती यासारखे उपक्रम कंपनी राबवते आहे. कंपनीमध्ये अथवा कुठेही काम करत असताना तुम्ही कसं वर्तन करता यावर सहकाऱ्यांचं वर्तन अवलंबून असतं. त्यामुळे मोठे भाऊ, आम्ही सर्वजण निर्व्यसनी असल्याने सहकाऱ्यांमध्ये तसे संस्कार रुजवू शकलो. यामागे सहकाऱ्यांची, त्यांच्या कुटुंबाची काळजी आहे. त्या काळजीतून सहकाऱ्यांचं आरोग्य सुधारावं म्हणून असे काही उपक्रम जाणीवपूर्वक राबवले जातात. त्यातूनही कोणी गैरवर्तन करताना आढळला तर त्याच्याकडून दंड वसूल केला जातो. ही रक्कम कामगार कल्याण निधीसाठी दिली जाते. व्यक्तिगत स्वच्छता सर्वचजण पाळतात, तशीच ती सार्वजनिकही पाळावी असं सांगतो. त्यातून परिसर आपोआप स्वच्छ राहतो.

कंपनीचा शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा या क्षेत्रावर भर राहिलेला आहे. आरोग्यासाठी खेळ खूप महत्त्वाचा आहे. त्याला प्रोत्साहन देत सहकारी त्यात सहभागी झाला पाहिजे, असा प्रयत्न केला जातो. याबरोबरच कोणाचा काही आरोग्यविषयक गंभीर प्रश्न असेल, तर कंपनी त्याच्यामागे खंबीरपणे उभी राहते. त्यासाठी आवश्यक असणारा लाखो रुपयांचा खर्च करत कंपनी संबंधिताला नवं जीवन देण्याचा प्रयत्न करते. आजवर कंपनीने कित्येकांना अत्यंत गंभीर आजारातून बाहेर काढत नवं आयुष्य दिलं आहे. केवळ आरोग्याच्या बाबतीतच अशी काळजी घेतली जाते, असं नाही. सहकाऱ्यांच्या वैयक्तिक, घरगुती समस्या सोडवण्यासाठीही कंपनी त्यांना मदत करते. म्हणूनच कंपनीच्या संकटकाळातही अनेकांची साथ लाभली. त्यातूनच कंपनी उभी राहत वाढली आहे हे आम्हीही विसरलेलो नाही. प्रत्येक सहकाऱ्यांच्या निष्ठेचे आणि अथक परिश्रमाचे संचित उद्योग समूहाच्या प्रगतीमागे निश्चितपणे आहे. म्हणून हा उद्योग समूह आपल्या सहकाऱ्यांच्या पाठीशी सदैव राहील, ही ग्वाही देतो.

